MHST120006052019

**नि.दि.दावा क्र.–२१६/२०१९ मधील नि.२६ वरील आदेश**

१. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. प्रतिवादी नं.१अ तर्फे विधीज्ञ श्री.एस.ए.सावंत व वादीचे वकील श्री.एन.एस.कलढोणे हजर. त्यांनी त्यांचे अर्जात व म्हणण्यात नमूद मजकुराप्रमाणे युक्तिवाद केला.

२. वर नमूद बाबींचा व संपूर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे सरसनिरस वाटप होवून त्याचा पृथक कब्जा मिळणेकरीता तसेच प्रवादी क्र.१ ने करुन दिलेले खरेदीपत्र बेकायदेशीर असलेने ते वादीवर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवून मिळणेकरीता दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी नं.१अ यांनी विनंती केली की ते अडाणी असून त्यांना कायदयाचे ज्ञान नाही. तसेच ते पोट भरणेकामी उसतोड कामगार म्हणून बाहेरगांवी गेले असलेमुळे त्यांना प्रस्तुत दाव्यासंबंधी महत्वाची माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नाहीत, त्यामुळे वकिलांना मुदतीत कागदपत्रे देवून माहिती न दिलेने वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. सबब, त्यांनी विनाकैफियतीचा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादीने म्हणणे दाखल करुन नमूद केले की, सदरचा अर्ज व त्यामधील संपूर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असून प्रस्तुत अर्जास कैफियत देणेस उशीर झालेचे कारण व कालावधी हे नमुद नसलेमुळे सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

४. वर नमूद बाबींचा व संपूर्ण संचिका पाहता असे दिसून आले की, दाव्याकामी प्रतिवादी क्र.१अ हे दि. २८/०६/२०२२ रोजी स्वताहून हजर होवून कैफियत दाखल

करणेस मुदत घेतली परंतु दि. २८/०९/२०२२ पर्यंत त्यांचे मार्फत कैफियत दाखल झाली नाही म्हणुन त्यांचे विरुध्द विना कैफियत आदेश पारित झाला. त्यानंतर प्रतिवादी क्र. १अ यांनी सुमारे ४३ दिवसानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये प्रवादी क्र.१अ हे बाहेरगांवी असलेने ते मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाहीत असे कारण नमूद केले आहे.

५. वर नमूद बाबींचा व संपूर्ण संचिका पाहता असे दिसून आले की, प्रतिवादी नं.१अ याने दिलेल्या मुदतीत अगर अपवादात्मक परिस्थितीमध्ये ९० दिवसांच्या आत कैफियत व म्हणणे दाखल केले नाही.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ मधील आदेश ८ नियम १ मध्ये तरतूद नमूद आहे की, 'प्रतिवादी यास दाव्याचे समन्सची बजावणी झालेल्या तारखेपासून त्याने ३० दिवसांच्या आत त्याची कैफियत दाखल करावी. तसेच सदर तरतूदीमध्ये परंतुकेव्दारे तरतूद करण्यात आलेली आहे की, जर प्रतिवादी याने ३० दिवसांच्या मुदतीत कैफियत दाखल न केल्यास त्याने योग्य तो कारण नमूद केले असता ९० दिवसांच्या आत कैफियत अपवादात्मक परिस्थितीमध्ये दाखल करुन घेता येईल.'

७. वर नमूद बाबींचा व संपूर्ण संचिकेचे अवलोकन करता असे दिसून येते की प्रतिवादी क्र. १अ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा शपथेवर दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं.१अ हे पोट भरणेकामी उसतोड कामगार म्हणून बाहेरगांवी असलेने मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाहीत.

८. न्यायप्रणालीचे तत्वाप्रमाणे प्रत्येक पक्षकारास आपली बाजू मांडण्याकरीता योग्य ती न्यायीक संधी देणे हे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपाच्या संदर्भात असून प्रतिवादी क्र. १अ यांना बचाव घेण्यास व त्या संदर्भात बचाव मांडण्याकरीता संधी देणे मला

न्यायोचित वाटते. सदर प्रतिवादी क्र.१अ यांना बचावाची संधी न दिल्यास भविष्यामध्ये बहू दावे होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच प्रतिवादी क्र.१अ यांचे म्हणणे अगर कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांच्या न्यायीक हक्कावर गदा येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. प्रतिवादी क्र.१अ यांचे कृत्य पाहता असे दिसून आले त्यांनी अर्जात नमूद केलेले कारणाच्या संदर्भात कोणताच पुरावा दाखल केला नाही. सबब, प्रतिवादी क्र.१अ यांचे कृत्य पाहता त्याचेवर खर्च रक्कम लादणे मला न्यायोचित वाटते. सबब, वर नमूद विवेचनाचा व अर्जातील कारणाचा विचार करता मला खालील आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते.

## आदेश

.१. प्रस्तुत नि.२६ हा अर्ज खर्च र.रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) वर मंजूर करण्यात येत आहे.

.२. खर्चाची र.रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) ही वादीला देणेत यावी.

*(खुल्या न्यायालयात न्यायसनावर घोषित करण्यात आला.)*

Swapnali Balaso Lendave

Digitally signed by Swapnali Balaso Lendave
Date: 2022.12.08 16:09:03 +0530

म्हसवड.
दि. ०८/१२/२०२२

**(एस.बी.लेंडवे)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,म्हसवड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | A.S.Gaikwad, Sr. Clerk |
| Name of Court | Jt. C.J.J.D.,Mhaswad, Tal.Man |
| Date of Dictation | 08/12/2022 |
| Order signed by the P.O. on | 08/12/2022 |
| Order uploaded on | 08/12/2022 |